# शबरी कुंभ कशासाठी
## गुणवंतसिंग कोठारी

आपला भारत देश पुण्यभूमी आहे. आपले महत्‌भाग्य आहे की आपला मानव जन्म या पुण्यभूमीतच झाला आहे. त्याबद्दल आपण परमेश्वराचे आभारच मानले पाहिजेत. जडामध्येही चैतन्य मानण्याची इथली संस्कृती आहे. म्हणूनच नदी, पर्वत, झाडे, पशू, पक्षी या सर्वांना चैतन्यमय मानले आहे. या भूमीला केवळ भूमी मानून कृतघ्नपणा करण्याचे धाडस आमच्यात नाही. आम्ही भूमीला मातृभूमी मानून वंदनच करू. या भरतखंडामधील ही संस्कृती अबाधित राखण्यासाठी सांस्कृतिक हेतूने पूज्य शंकराचार्यांनी देशाच्या चार टोकांना कुंभमेळ्याची परंपरा सुरू केली. प्रयाग, उज्जैन, हरिद्वार आणि नाशिक या ठिकाणी भरणारा कुंभमेळा या देशाच्या सांस्कृतिक एकतेचे प्रतीक आहे. या देशात सांस्कृतिक एकता जपण्याचे कार्य जरी कुंभाच्या माध्यमातून होत असले तरी देशाला त्यासाठी वेगळे प्रयत्न करण्याची कधीच गरज भासली नाही. कोणतेही निमंत्रण न पाठवता ठरलेल्या दिवशी त्या तीर्थक्षेत्रांवर लाखो भाविक येतात, स्नान संध्या करतात आणि धर्मकार्य करत असतात. हजारो वर्षांची हीच परंपरा आहे.

धार्मिक अस्मितेचे प्रतीक असलेल्या कुंभाचीच पुनरावृत्ती शबरी कुंभाच्या निमित्ताने होणार आहे. धर्मांतर झालेल्यांना कोणत्याही कारणांमुळे प्रलोभनांमुळे, दबावामुळे, अगतिकतेमुळे धर्माचा त्याग केलेल्यांना आपल्या हिंदू धर्माच्या अस्मितेची आठवण करून देण्यासाठीच गेल्या नऊ वर्षांपासून धर्मजागरणाच्या माध्यमातून धर्मवापसीचे (स्वगृही) कार्य सुरू करण्यात आले आहे.

डांग जिल्ह्यामध्ये पूज्य मोरारी बापूंनी 'रामकथा' सादर केली त्यावेळी त्यांच्या सहज उद्‌गारातूनच शबरी कुंभाची कल्पना जन्मली. ज्या ठिकाणी शबरीची भक्ती आणि श्रीरामांची करुणा यांचा संगम होतो ते ठिकाण एखाद्या तीर्थक्षेत्राच्याच दर्जाचे आहे म्हणून हिंदू धर्माच्या अस्तित्वाच्या आणि अस्मितेच्या रक्षणासाठीच शबरीकुंभाची रचना करण्यात आली आहे, असे आपल्याला म्हणावे लागेल.

या देशामध्ये १२ व्या शतकात इस्लामने शिरकाव केला. इस्लामी राज्यकर्त्यांनी तलवारीच्या धारेवरती या देशात धर्मांतर घडवून आणण्यास सुरुवात केली. इस्लाम न स्वीकारणाऱ्यांना मृत्यूदंड निश्चित होतो. हिंदू धर्मातील अनेक उणीवाही धर्माच्या हानीसाठी कारणीभूत ठरल्या. जाती भेदांमुळे आपल्याच बांधवांना आपण परके झालो. अखंड हिंदू समाज हा या जातींमध्ये खंडित होत गेला. सतत आठशे वर्षांपर्यंत हे दुष्टचक्र सुरू राहिले. त्यानंतर देशावर इंग्रजांचे राज्य आले. इंग्रजांनी देशातील वनवासींना आपले लक्ष्य बनवले. गावातील भोळ्या जनतेला भूलवून फसवून 'सेवा आणि शिक्षणाचे' आमिष दाखवून धर्मांतरित करण्याचा त्यांनी चंग बांधला. गोड बोलून धर्मांतर केले जाते, ही पद्धत हिंदूंसाठी नवीन होती. स्वातंत्र्यानंतरच्या काळात या पद्धतीने धर्मांतर करण्याचा वेग वाढला होता. म्हणूनच त्याचा परिणाम धर्मांतरित होणारी व्यक्ती समाजापासून, नातेवाइंकापासून वेगळी पडते. ती व्यक्ती धर्मातूनच बाहेर जात नाही तर परंपरा, रूढी यांचाही त्याग करते. हळूहळू हिंदू धर्माबद्दलचा तिटकारा इतका वाढतो की देशाच्या पातळीवरही ही द्वेषाची भावना जाऊ शकते. अशामुळे काय होऊ शकते याचे प्रत्यंतर आपण १९४७ साली झालेल्या फाळणीमध्ये घेतले आहे. देशाची फाळणी ही काही एका रात्रीत घडलेली घटना नव्हती. ती एक प्रदीर्घ प्रक्रिया होती. या देशाच्या विरोधातील विषारोपण कित्येक वर्षांपूर्वीपासूनच सुरू होते. त्याचे पर्यवसन फाळणीमध्ये झाले.

आताही त्याच फाळणीच्या वाटेवर देशाला चालावे लागते आहे. देशाच्या ज्या ज्या भागांमध्ये हिंदूंची संख्या घटत चालली आहे त्याच भागांमध्ये अराष्ट्रीय कारवायांचा जोर वाढतो आहे असे आपल्या निदर्शनास आले आहे. देशाच्या पूर्वोत्तर भागात, नागालँड, मणिपूर, अरुणाचल प्रदेश, आसाम या राज्यांचा मिळून एक 'न्यू इंडिया कॉलनी' नावाचा भूभाग तयार करण्यात येऊ पाहत आहे. त्या भागाला भारतापासून वेगळा करण्याचे कारस्थान सुरू आहे कारण त्या भागातील हिंदूंना ख्रिश्चन करण्यात आले आहे. त्यांच्या धर्माचेच नाही तर निष्ठांचेही परिवर्तन करण्यात आले आहे.

धर्मांतर करणे हा इंग्रजांचा कावा होता. स्वातंत्र्यानंतर इंग्रज निघून गेले. आता सर्व काही ठीक होईल असे इथल्या अनेक समाज धुरिणांना वाटत होते, पण हा गैरसमज होता. स्वातंत्र्यापूर्वीपेक्षा स्वातंत्र्यानंतरच्याच कालखंडात धर्मांतर अधिक झाले आहे. हा वेग आता भयावह रीतीने वाढू लागला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या जनगणनेच्या अहवालावरून त्याची प्रचीती येते. २०६० पर्यंत या देशात हिंदू अल्पसंख्य झालेला असेल अशी भीती व्यक्त करण्यात येऊ लागली आहे. त्यामुळे या देशात होणारे धर्मांतरण, मतांतरण थांबवणे हे आपल्यासमोरचे एकमेव उद्दिष्ट असले पाहिजे. शबरी कुंभाच्या आयोजनामागेही हाच एकमेव उद्देश आहे.

या देशातील हिंदू हा हिंदूच राहिला पाहिजे. आपल्या इतिहासातील चुका समजून घेऊन त्या दुरुस्त करण्याची आता गरज आहे. आपल्याच देश बांधवांना जातींच्या भेदात अडकवून त्यांना दुर्लक्षिण्याचा परिणाम म्हणून त्यांनी धर्मपरिवर्तन केले. त्याच बरोबर आणखी एका गोष्टीचा फार मोठा तोटा झाला. या देशातील वनवासींना स्वतःचा असा धर्म नाही, ते निसर्गपूजक आहेत म्हणजेच ते हिंदू नाहीत असा अपप्रचार करण्यात येतो. इंग्रजांनी या देशातल्या तथाकथित बुद्धिवंतांनी हेतुपुरस्सर रीतीने पसरवलेल्या या अफवा आहेत. हिंदूंमध्ये कणाकणामध्ये चैतन्य मानण्याची परंपरा आहे. वनवासी चंद्र, सूर्य, नदी, पर्वत, झाडे, पशू या सर्वांनाच देव मानतात. राम, कृष्ण हे याच वनवासींचे आराध्य दैवत आहेत. ते हिंदू नाहीत असे मानणे म्हणजे त्यांना देशाच्या राष्ट्रीयत्वापासून दूर करण्यासारखे आहे. ज्या गोष्टींची वनवासी प्रतिकात्मक पूजा करतात त्यांची मूर्त रूपाने शहरी लोक पूजा करतात. म्हणून वनवासी काही अहिंदू ठरत नाहीत. काहीवेळा या अपप्रचाराला आपलेच बांधव बळी पडतात कारण आपल्याच धर्माविषयी, परंपरांविषयी आणि इतिहासाविषयी असलेले अज्ञान होय. अपरिचय असला तर अपप्रचार सुरू राहणारच. इतिहासाची पूर्ण ओळख करून घेतल्यास अशा अपप्रचाराला कोणीही बळी पडणार नाही. नागालँडची राणी गायडिनल्यू, मिझोरामची स्वातंत्र्यसैनिक मोपुलियानी, सोमनाथसाठी प्रार्णापण करणारा पहिला बेगडा भिल्ल, पूंजा भिल्ल बिरसा मुंडा, तलक्कल चंदू, जातो नाद या श्रेष्ठांच्या कर्तृत्वाचे स्मरण केल्यावर आपला इतिहास किती गौरवशाली आहे याची खात्री पटते, याच वीरांनी देशासाठी शौर्य गाजवले असताना त्यांच्या वंशजांना धर्म परिवर्तन कसे करता येईल.

वनवासींची जीवनशैली आदर्श जीवनशैली आहे असे म्हणावे लागेल. निसर्गाच्या सानिध्यात, निसर्गाच्या उपासनेत ते जीवन घालवतात, हिरवी झाडे तोडत नाहीत, आपली बोली, परंपरा, भाषा, गान, नृत्य यातूनच वनवासींची ओळख टिकून राहते. आपण सारे एकाच परमेश्वराची लेकरे आहोत याच एका भावनेतून हे वनवासी एकत्र बांधले आहेत. त्यांना भौतिक सुखाची अभिलाषा नाही. त्यांची या देशाशी जोडलेली ही सांस्कृतिक नाळ तुटू न देणे हे शबरी कुंभाच्या आयोजनाचे उद्दिष्ट आहे. त्यातूनच अस्मितेचे जागरण होईल.

पूज्य असिमानंदांच्या प्रयत्नातून डांग जिल्ह्यात २० हजार वनवासी पुन्हा हिंदू धर्मात आले. मोगरामातेला शरण आले. राजस्थानातील अजमेर जिल्ह्यात रावत गावी ५० हजार बंधू पुन्हा हिंदू धर्मात आले. हे सारे पृथ्वीराजांचे वंशज आहेत. गेल्या ५० वर्षांमध्ये याच आपल्या बंधूंपर्यंत आपणच पोहोचलो नाही, अशा कितीतरी जणांपर्यंत आपल्याला पोहोचायचे आहे. एकतेचा, संस्कृतिचा संदेश घेऊन जायचे आहे. शबरी कुंभ हे त्यासाठी एक निमित्त ठरणार आहे. वनवासींनी एकत्र यावे आणि स्वतःचा विकास साधावा अशी यामागील धारणा आहे. आता वनवासी सुशिक्षित तरुण बेरोजगार राहू नये, अन्न, वस्त्र, निवारा यांची उणीव भासू नये. स्वतःच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वनवासी स्वतः सक्षम बनावा यासाठी शबरी कुंभमेळा आयोजित केला आहे. निसर्गातूनच आपल्या गरजा कशा पूर्ण करता येतील याचे प्रशिक्षणच या कुंभातून मिळणार आहे. करंज्याच्या तेलापासून बायोडिझेल, देशी खाद्य, गोधन, गाईचे शेण, मूत्र यापासून औषधी उत्पादने अशा अनेक गोष्टींची आपल्याला माहितीही नाही. ती माहिती करून घ्यायला हवी. आपल्या देशातील एक घटक अशिक्षित आणि मागास राहणे योग्य नाही. समृद्ध भारताची अपेक्षा करताना सर्वांनीच समान भार उचलायला हवा.

जेथे पशू - पक्षीही देव भाषेत संस्कृतमध्ये संभाषण करत असत जेथे, दुधा दह्याच्या नद्या वाहत असत असे समृद्ध वर्णन आपल्या भारताचे केले जात होते ते आठवून त्याच्या प्रमाणे समृद्धी आणायची ठरवल्यास आपल्याला देशाची सामाजिक आणि धार्मिक विपन्नावस्था दूर करावी लागेल. त्यासाठी धर्म जागरणाच्या कार्यालाही गती द्यावी लागेल. शबरी कुंभाचे आयोजन त्यासाठी आहे.